मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# निधीसाठी हिवाळी अधिवेशनामध्ये लक्ष वेधणार

## आढावा बैठकीत शहरातील आमदारांची एकजूट : विकासकामांबाबत ऑटो क्लस्टर येथे आढावा बैठक झाली.



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरातील नव्याने विकसित होणारा भाग, समाविष्ट गावांमधील जलनि:सारण व्यवस्था, नवीन जलवाहिनी निर्माण करणे, पाणी पुरवठा नवीन जलस्त्रोत आणि प्रकल्प मार्गी लावणे आणि त्यासाठी लागणारा निधी राज्य शासनाच्या माध्यमातून उपलब्ध होण्यासाठी शहरातील आमदार हिवाळी अधिवेशनामध्ये लक्ष वेधणार आहेत.

पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून शहरातील विविध प्रकल्प आणि प्रस्तावित विकासकामांबाबत ऑटो क्लस्टर येथे आढावा बैठक झाली. महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी माहिती दिली. यावेळी आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप व विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

शहरातील पर्यावरण संवर्धन आणि नागरी आरोग्याच्या दृष्टीने नवीन तंत्रज्ञानानुसार जलवाहिनींची देखभाल दुरूस्ती करणे, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची क्षमता आणि गुणवत्ता वाढवणे. हवा प्रदूषण नियंत्रण उपाययोजना, पवना बंद पाइपलाइन, मिळकतकर सर्व्हेक्षण, लाइट हाऊस, कॅन्सर हॉस्पिटल थेरगाव, सारथी हेल्पलाइन सक्षमीकरण आदी विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. शहरातील विकासकामांना गती देण्याबाबत सर्वोतोपरी सकारात्मक कार्यवाही करण्याची सूचना यावेळी केली आहे. या बैठकील महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. विकासकामांबाबत ऑटो क्लस्टर येथे आढावा बैठक झाली. महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी माहिती दिली. यावेळी आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप व विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

### शहराच्या विकासाची घोडदौड कायम ठेवणार

» पिंपरी चिंचवड शहराचा विकास होत असताना अनेक विकासकामांना निधीची आवश्यक्ता भासत आहे. निधी उपलब्ध करण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून विविध उपाययोजना केल्या जात असल्या, तरीदेखील राज्य सरकारकडून निधी मिळाल्या या विकासकामांना बूस्टर मिळू शकणार आहे. त्यामुळे शहराच्या विकासाची घोडदौड कायम ठेवण्यासाठी शहरातील सर्वच आमदार प्रयत्नशील राहणार आहेत.

# देहूरोडपर्यंत मेट्रो रेल्वेचा विस्तार करण्याची मागणी

## मावळ विधानसभेचे आमदार सुनील शेळके यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



**पिंपरी | प्रतिनिधी**

देहूरोड ते निगडी मेट्रो रेल्वे प्रकल्प सुरू करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अजित पवार) देहूरोड शहर युवकाध्यक्ष आशिष बन्सल यांनी मावळ विधानसभेचे आमदार सुनील शेळके यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

तीर्थक्षेत्र देहूगाव येथे वर्षातून तीनदा यात्रेच्या निमित्ताने लाखो भाविक येत असतात. तर प्रतिदिनी हजारो भाविक व पर्यटक देहूत येत असतात. यासह धम्मभूमी, दीक्षाभूमी, चैत्यभूमी असा त्रिवेणी संगम असणाऱ्या देहूरोड शहरातील वर्षभर बौद्ध बांधव व पर्यटक येथे येतात.

देहूरोड व निगडी या दोन्ही भागांमध्ये मोठ्या प्रमाणात लोकवस्ती आहे. मेट्रो रेल्वेमुळे या दोन्ही भागातून प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या वेळेची, पैशाची बचत होईल. मेट्रो रेल्वेमुळे खासगी वाहनांची संख्या कमी होऊन वाहतूक कोंडी कमी होईल. मेट्रो रेल्वे ही पर्यावरणपूरक वाहतूक व्यवस्था असल्यामुळे प्रदूषण कमी होईल. मेट्रोमुळे शहराचा सर्वसमावेशक विकास होईल. त्यामुळे देहूरोडपर्यंत मेट्रो सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या निगडी येथील भक्ती-शक्ती चौकापर्यंत मेट्रो सुविधा उपलब्ध करण्यात येत आहे. अशावेळी जवळच अडीच किमी अंतरावर असणाऱ्या देहूरोडपर्यंत मेट्रो प्रकल्पाचा विस्तार करण्यात यावा. याचा सर्व प्रवाशांना आणि परिसराला मोठ्या प्रमाणात लाभ होईल. त्यामुळे देहूरोड पर्यंत मेट्रो करावी, अशी मागणी आमदार शेळके यांच्याकडे आशिष बन्सल यांनी केली आहे. यावेळी शहराध्यक्ष प्रविण झेंडे, अतुल मराठे, जालिंदर राऊत उपस्थित होते.

# नोटरी व्यावसायिकांना दिलासा

## पालिकेने थांबवली अतिक्रमण कारवाई, ॲडव्होकेट बार असोसिएशनने घेतली आयुक्तांची भेट



**पिंपरी | प्रतिनिधी**

गेल्या दोन दिवसांपासून पिंपरी न्यायालय परिसरात नोटरी वकिलांवरती महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाकडून कारवाई सुरू होती. दरम्यान, या कारवाईचा विरोध दर्शवत पिंपरी-चिंचवड ॲडव्होकेट बार असोसिएशनच्या वतीने कारवाई थांबवण्याची मागणी केली. चिंचवड येथील ऑटो क्लस्टर येथे आलेल्या महापालिका आयुक्त शेखर सिंह यांची याबाबत भेट घेऊन त्याबाबत आदेश देण्याची मागणी केली.

पिंपरी न्यायालय परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून वकील या ठिकाणी नोटरी व्यवसाय करतात. गेल्या दोन दिवसांपासून पिंपरी न्यायालयाच्या आवारात नोटरी वकिलांवर होत असलेल्या अतिक्रमण कारवाईसंदर्भात असोसिएशनने कारवाई तत्काळ थांबवण्यासाठी विनंती केली.

बार असोसिएशनच्या मागणीला मान देत नोटरी वकिलांची इतर ठिकाणी बसण्याची सोय करेपर्यंत कारवाई न करण्यासाठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना आयुक्तांनी तत्काळ सूचना केल्या. तसेच कारवाई स्थगित करण्याचे आदेश दिले. यावेळी पिंपरी-चिंचवड ॲडव्होकेट बार असोसिएशनची संपूर्ण नवनिर्वाचित कार्यकारिणी उपस्थित होती.

दरम्यान, बार असोसिएशनच्या माध्यमातून आयुक्तांना वकिलांच्या समस्याही मांडल्या. या ठिकाणी नोटरी वकील गेल्या अनेक वर्षांपासून बसत आहेत. याबाबत येत्या आठवडाभरात स्वतंत्र बैठक घेण्यात येणार असून, त्याबाबत निर्णय घेण्यात येणार असल्याचेही असोसिएशनने सांगितले.

# पुणे जिल्ह्याला चार मंत्रिपदे; पुणे शहरातून प्रथमच महिला मंत्री

## अजित पवार यांच्यानंतर चंद्रकांत पाटील, माधुरी मिसाळ, दत्ता भरणे यांचीही वर्णी; मात्र पिंपरी-चिंचवड अद्याप वंचित

**पुणे | प्रतिनिधी**

मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्र्यांनी शपथ घेतल्यानंतर राज्य मंत्रिमंडळाच्या विस्ताराकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले होते. अखेर रविवारी (दि. १५) देंवेंद्र फडणवीस सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तार झाला. या मंत्रिमंडळात पुण्याला लॉटरी लागली असून तीन जणांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यानंत र पुणे शहरातून चंद्रकांत पाटील आणि माधुरी मिसाळ या दोघांची तर जिल्ह्यातून दत्ता भरणे अशी एकूण चौघांची पुणे जिल्ह्यातून मंत्रिपदी वर्णी लागली आहे. माधुरी मिसाळ यांच्या रूपात प्रथमच पुण्यातील महिलेला मंत्रिपद मिळाले आहे.



विधानसभा निवडणुकीत महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाल्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नाराजीनाट्य रंगले होते. यामुळे तब्बल १३ दिवसांनी मोठ्या दिमाखात मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्र्यांचा शपथ विधी पार पडला. त्यानंतर मंत्रिमंडळाचा विस्तार होण्यास वेळ लागत होता. या शपथविधीनंतर १० दिवसांनी नागपुरात मंत्रिमंडळाचा विस्तार पार पडला.

तसे पाहता पुणे जिल्ह्याला सहा मंत्रिपदे अपेक्षित होती. त्यात पुणे शहरात दोन, पिंपरी चिंचवडमधून एक आणि जिल्ह्यात तिघांना मंत्रिपद मिळेल, अशी शक्यता होती. परंतु केवळ चारच मंत्रिपदे मिळाली. तब्बल २० वर्षांनंतरही पिंपरी चिंचवड शहराला मंत्रिपद मिळालेले नाही. सोमवारपासून (दि. १६) नागपूर हिवाळी अधिवेशनास सुरुवात होणार आहे.

जिल्ह्यातील २१ आमदारांपैकी फक्त वडगाव शेरीतील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे बापूसाहेब पठारे आणि खेड-आळंदीतील शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे बाबाजी काळे वगळता सर्व आमदार सत्ताधारी महायुतीचे आहेत. जुन्नर विधानसभेतून शरद सोनवणे अपक्ष म्हणून निवडून आले. पण त्यांनी लगेचच शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाला पाठिंबा जाहीर केला. त्यामुळे सत्ताधारी महायुतीचे २१ पैकी १८ आमदार जिल्ह्यात आहेत. त्यातील किमान सहा जणांना मंत्रिपदे मिळतील, अशी अपेक्षा होती.

कोथरूडचे आमदार चंद्रकात पाटील पक्षात ज्येष्ठ आहेत. त्यांचे मंत्रिपद फिक्स मानले जात होते. अपेक्षेप्रमाणे आमदार चंद्रकांत पाटील यांच्या गळ्यात दुसऱ्यांदा मंत्रिपदाची माळ पडली. त्यांच्यासह पुण्यातील पर्वती मतदारसंघातून माधुरी मिसाळ सलग चौथ्यांदा आमदार झाल्या. त्यांनी मागच्या सरकारच्याच काळात मंत्रिपदासाठी लॉबिंग केले होते. परंतु त्यांना मंत्रिपद मिळाले नव्हते. यंदाच्या विधानसभेत त्यांनी चौथ्यांदा आमदारकीवर शिक्कामोर्तब केले. ज्येष्ठतेमध्ये मिसाळ यांचे नाव आघाडीवर होते.

> पक्ष देईल ती जबाबदारी पार पाडायची, हा शिरस्ता मी ठरवला आहे. यावेळीही मंत्रिमंडळात जी जबाबदारी येईल, त्याला न्याय देण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करणार आहे. कोथरुडमधील जनतेने मला सलग दुसऱ्यांदा निवडून दिल्यामुळेच मला ही संधी मिळू शकली. पुण्याचा विकास वेगाने होत आहे. आता येत्या काळात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली तो आणखी वेगाने आणि नियोजनबद्ध व्हावा, यायसाठी मी प्रयत्न करणार आहे.
>
> \- चंद्रकांत पाटील, कॅबिनेट मंत्री

> मी अनेक वर्ष पुणेकर जनतेची सेवा करीत आहे. पक्ष सांगेल ती जबाबदारी पार पाडली. महापालिका, विधानसभा आणि लोकसभेला अधिकाधिक लोकप्रतिनिधी निवडून यावे, याकरिता प्रयत्न केले. विविध प्रकल्पांच्या माध्यमातून जनतेचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी यथोचित प्रयत्न केले. माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्तीला पक्षाने न्याय दिला आणि जनतेची सेवा करण्यासाठी पुन्हा मंत्रिमंडळात स्थान दिले. त्याबद्दल मी पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रीय पक्षाध्यक्ष जे. पी. नड्डा, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह पक्षाचे सर्व वरिष्ठ नेते आणि पदाधिकारी यांची आभारी आहे.
>
> \- माधुरी मिसाळ, राज्यमंत्री

# पुण्याला 134 इलेक्ट्रिक बस, प्रवाशांना दिलासा; दोन महिन्यांत अंमलबजावणी

## अभ्यासिका उपलब्ध करून देण्याचे नियोजन असल्याचेही आयुक्तांनी सांगितले.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे एसटी विभागात नव्याने १३४ ई- बस दाखल होणार असून, प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. एसटीच्या ताफ्यातून लालपरी कमी झाल्याने गाड्यांची संख्या कमी झाली होती. त्यामुळे नव्या इलेक्ट्रिक बसची मागणी करण्यात आली असून, त्या पुढील दोन महिन्यांत येतील, अशी माहिती एसटी प्रशासनाकडून देण्यात आली.




एसटी महामंडळाकडून डिझेलच्या गाडीमुळे होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी इलेक्ट्रिक बस खरेदी करण्यावर अधिक भर देण्यात येत आहे. सध्या विविध सवलतीमुळे एसटीचे प्रवासी वाढले आहेत. त्यामुळे एसटीच्या दैनंदिन प्रवासी संख्येत वाढ झाली आहे, तसेच वातानूकुलित इलेक्ट्रिक बस असल्यामुळे प्रवाशांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

पुण्यातून सोलापूर, कोल्हापूर, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर या मार्गांवर इलेक्ट्रिक बस धावत आहेत. पुढील काळात या मार्गासह अन्य मार्गांवरही इलेक्ट्रिक बसची संख्या वाढविण्यात येणार आहे. त्यामुळे नव्याने दाखल होणाऱ्या इलेक्ट्रिक बसचा फायदा होणार असून, बसची संख्याही वाढणार आहे. त्यामुळे प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.

> कोल्हापूर, नाशिक, सोलापूर आणि छत्रपती संभाजीनगर या मार्गावरील इलेक्ट्रिक बसला चांगला प्रतिसाद मिळत आहे. लवकरच १३४ इलेक्ट्रिक बस पुणे विभागात दाखल होणार आहेत. त्यामुळे प्रवाशांना तात्काळ, आरामदायी आणि वातानूकुलित प्रवास उपलब्ध होणार आहे.
>
> \- प्रमोद नेहूल, विभाग नियंत्रक, पुणे विभाग

# संक्रांत सणामुळे चिक्की गुळास उठाव

## साखर मंदीतच; खाद्यतेले, डाळींसह सर्वच जिनसांचे दर स्थिर

**पुणे | प्रतिनिधी**

आगामी संक्रांतीमुळे चिक्की गळास मागणी वाढली असून, दरात वाढ झाली मात्र मागणी कमी असल्यामुळे साखरेच्या दरातील घसरण सुरूच आहे. गेल्या आठवड्यातही दर आणखी २५ रुपयांनी उतरले. मात्र, आवक-जावक कमी असल्यामुळे खाद्यतेले, डाळींसह सर्वच जिनसांचे दर स्थिर असल्याचे येथील घाऊक बाजारातून सांगण्यात आले.



संक्रातीच्या सणासाठी गूळ पापडी, तीळवडी व इतर जिन्नस बनविण्यासाठी प्रामुख्याने चिक्की गुळाचा वापर होतो. संक्रांतींचा सण जवळ आला असून, यामुळे चिक्की गुळास मागणी वाढली आहे. इतर गुळाचाही खप वाढला आहे. यामुळे मध्यंतरी घसरलेले दर सुधारले असून, गेल्या आठवड्यात सर्व प्रकारच्या गुळाच्या दरात क्विंटलमागे ५० रुपयांनी वाढ झाली. सध्या बाजारात कऱ्हाड, तसेच केडगाव भागातून चिक्की गुळाची आवक होत आहे.

साखरेची आवक मुबलक प्रमाणात होत असून, कारखान्यांकडून विक्री मोठ्या प्रमाणात होत आहे. यामुळे दरात घसरण सुरूच आहे. गेल्या आठवड्यातही साखरेच्या दरात क्विंटलमागे आणखी २५ रुपयांनी घट झाली. शनिवारी येथील घाऊक बाजारात एस ३० साखरेचा प्रतिक्विंटलचा दर ३६५०-३७०० रुपये होता.

गव्हाची दरवाढ रोखण्यासाठी केंद्र सरकारने अन्न महामंडळामार्फत मिलबर गव्हाची विक्री सुरू केली आहे. यामुळे गव्हाची दरवाढ थांबली आहे. गेल्या आठवड्यातही मागणी साधारण असल्यामुळे ज्वारी, गहू, तांदळाचे दर स्थिर होते. नव्या तांदळाची आवक तुरळक प्रमाणात सुरू झाली आहे. मात्र, अद्याप दर टिकून असल्याचे सांगण्यात आले. मागणीअभावी रवा, मैदा, तसेच आट्याचे दर स्थिर होते. अद्यापही तुरडाळीचा तुटवडा असल्यामुळे तुरडाळीची दरवाढ कायम आहे. मात्र, हरभराडाळीचे दर मंदीतच आहेत.

निर्यात होत नसल्यामुळे सध्या शेंगदाण्याची आवक मुबलक प्रमाणात होत आहे. यामुळे दरात घसरण सुरूच आहे. गेल्या आठवड्यातही ही स्थिती कायम होती. भाताच्या दरवाढीमुळे पोह्यांच्या दरात मोठी वाढ झाली आहे. नवा भात उपलब्ध झाला असला, तरी दर तेजीत असल्यामुळे भाववाढ झाल्याचे सांगण्यात आले.

# उद्योगनगरीच्या पदरी पुन्हा निराशा

## गेल्या अनेक वर्षांपासून उद्योगनगरीला मंत्रीपदापासून वंचित : यंदाही मंत्रीपदाची हुलकावणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

उद्योगनगरी म्हणून देशभरात प्रचलित असलेल्या पिंपरी-चिंचवड शहराच्या पदरी मंत्रीपदाबाबत पुन्हा एकदा निराशा आली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून उद्योगनगरीला मंत्रीपदापासून वंचित ठेवण्यात आले आहे.

सलग तीनदा निवडून आलेले आमदार महेश लांडगे असो वा विक्रमी मताधिक्याने जिंकलेले शंकर जगताप असो किंवा तिसऱ्यांदा जिंकणारे आमदार अण्णा बनसोडे असो कुणालाही भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसने मंत्रीपदाची संधी दिली नाही. भाजपसह राष्ट्रवादीच्या आमदारांना मंत्रीपद न मिळाल्याने कार्यकर्त्यांची मोठी निराशा झाली आहे. त्यामुळे शहराला मंत्रीपद तरी कधी मिळणार? असा सवाल पिंपरी चिंचवडकर करु लागले आहेत.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय व पिंपरी चिंचवड शहरातील भोसरी विधानसभा मतदार संघातून विजयाची हॅट्रीक करणारे आमदार महेश लांडगे ये मंत्रीपदाचे प्रबळ दावेदार समजले जात होते. भाजपचा प्रबळ हिंदुत्ववादी चेहरा अशी आमदार लांडगे यांची ओळख आहे. अनेक हिंदुत्ववादी संघटनांबरोबरच त्यांचे असलेले सलोख्याचे संबंध हा त्यांच्या पूरक गुणामुळे त्यांना मंत्री पद मिळावे, अशी अनेकांची अपेक्षा होती. भोसरी विधानसभा मतदारसंघात हिंदुत्त्वासोबतच विकासाचे नवे मॉडेल उभे करणारे लांडगे यांना पुन्हा एकदा डावलण्यात आले. विधानसभा निवडणुकीतील विजयानंतर त्यांचे भावी मंत्री असे फलक मतदारसंघात झळकले होते. मात्र, त्यांना भाजपच्या कोट्यातून मंत्रीपद मिळविण्यात यश आले नाही.

राष्ट्रवादीचे विद्यमान आमदार आण्णा बनसोडे हे यंदा पिंपरी विधानसभा मतदार संघाचे तिसऱ्यांदा प्रतिनिधित्व करीत असून, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे कट्टर समर्थक अशी त्यांची ओळख आहे. अजित पवार यांच्या राजकीय बंडाच्यावेळी बनसोडे हे अजित पवार यांच्या पाठिशी ठामपणे उभे राहिले. त्यामुळे तीन वेळा निवडून येण्याबरोबरच अजित पवार यांच्याशी असलेल्या घनिष्ठ संबंधांमुळे त्यांना मंत्रीपद मिळेल, अशी राजकीय वर्तुळात चर्चा होती. मात्र, राष्ट्रवादीच्या कोट्यातील मंत्रीमंडळात त्यांची वर्णी लागू शकली नाही.

सध्या शहरातील विधानसभा सदस्यांची संख्या 3 तर विधानपरिषद सदस्यांची संख्या 2 असे एकूण पाच आमदार शहरात वास्तव्यास आहेत. यापैकी अमित गोरखे यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्षपद भूषविले होते. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय असलेले गोरखे यांना मंत्रीपद देण्याची मागणी समाज बांधवांनी केली होती. मात्र त्याला यश आले नाही.

### भाजपला भरभरुन दिले पण...

» पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांनी २०१४ पासून आजवर झालेल्या सर्वच निवडणुकांमध्ये भाजपला भरभरुन मतदान केले आहे. पिंपरी-चिंचवडकरांनी कधीच महायुतीला नाराज केले नाही. चिंचवड आणि भोसरी हे दोन विधानसभा मतदारसंघ अस्तित्वात आल्यापासून आजवर कधीच भाजपशिवाय इतर कोणत्याही पक्षाला विजय मिळविता आला नाही. एवढा विश्वास नागरिकांनी भाजपवर टाकला होता. २०१७ साली पिंपरी-चिंचवडकरांनी महापालिका निवडणुकीतही भाजपला प्रचंड बहुमत देत महापालिकेची सत्ता पहिल्यांदा भाजपच्या हाती दिली होती. मावळ लोकसभा मतदारसंघातून देखील सातत्याने महायुतीचा खासदार निवडून देण्यात पिंपरी-चिंचवडकरांनी कोणतीही कसर बाकी ठेवली नाही. २०२४ साली राज्यात सर्वत्र महायुतीची पीछेहाट होत असताना मावळ लोकसभा मतदारसंघातून महायुतीचा खासदार व्हावा, याकरिता पिंपरी आणि चिंचवडच्या मतदारांनी प्रचंड मतदान करत महायुतीच्या उमेदवाराचा विजय निश्चित केला. परंतु दरवेळी प्रमाणे यंदाही शहराच्या पदरी निराशाच आली.

# पीएमपीची चाके फिरू लागली उलटी!

## प्रवासी अन् उत्पन्नही घटले : गतवर्षीच्या तुलनेत यंदा 23 कोटी 40 लाखांची घसरण

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपी) उत्पन्न आणि प्रवासी संख्येत यंदा गतवर्षीच्या तुलनेत घसरण झाली आहे. नोव्हेंबरअखेर २३ कोटी ४० लाख इतके उत्पन्न कमी झाले आहे. परिणामी यंदा संचलन तूट वाढण्याची शक्यता आहे.



पीएमपीकडून पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पीएमआरडीए हद्दीत प्रवासी सेवा दिली जाते. दैनंदिन १९४५ बसमधून दिवसाला ११ ते १२ लाख प्रवासी प्रवास करतात. यामध्ये पीएमपीच्या स्वमालकीच्या १००४ आणि खासगी ९४१ बस धावतात. यातून दैनंदिन एक कोटीपेक्षा जास्त उत्पन्न मिळते; परंतु हे उत्पन्न खर्चाच्या तुलनेत कमी आहे. त्यामुळे दिवसेंदिवस पीएमपीचे आर्थिक घट जास्त होत आहे.

पीएमपी प्रशासनाकडून उत्पन्नवाढीसाठी अनेक उपाययोजना करत आहेत. उत्पन्नाचे उद्दिष्ट साध्य होताना दिसत आहे; परंतु मागील दोन अध्यक्षांनी उत्पन्नवाढीसाठी प्रत्यक्ष मार्गावर फिरून आढावा घेत तोट्यात असलेले काही मार्ग बंद केले होते. त्याचा परिणाम उत्पन्नवाढीवर झाला होता. तसेच लांब पल्ल्याच्या तोट्यातील मार्ग बंद करून ज्या मार्गावर जादा उत्पन्न आहे, अशा मार्गावर गाड्या सोडण्यात आल्या. त्याचा फायदा 'पीएमपीएमएल'ला झाला होता.

### पीएमआरडीए हद्दीतील प्रवासाचा फटका

» पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून 'पीएमआरडीए'च्या हद्दीत १२२ मार्गांवर ५०२ बसद्वारे सेवा दिली जाते. या हद्दीत अनेक लांब पल्ल्याचे मार्ग आहेत. त्यामुळे बस संचलनासाठी पीएमपीला मोठा खर्च येतो. त्यामुळे तत्कालीन 'पीएमपी'चे अध्यक्ष ओमप्रकाश बकोरिया यांनी 'पीएमआरडीए'च्या हद्दीतील मार्ग बंद केले होते; परंतु, पुण्याच्या पालकमंत्र्यांनी पीएमपी अध्यक्षांची भेट घेऊन संचलन तुटीचे पैसे पीएमपीला 'पीएमआरडीए'कडून देण्याचे आश्वासन दिले होते. त्यासाठी पीएमआरडीएच्या आयुक्तांना पीएमपीच्या संचालक मंडळातही समाविष्ट करून घेतले. त्यामुळे उत्पन्नात घट होत आहे.

# पूर नियंत्रणासाठी वर्षआधीच करा नियोजन

## पुणे महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांचे प्रशासनाला आदेश

**पुणे | प्रतिनिधी**

यंदा जुलै महिन्यात आलेल्या पावसामुळे पूरस्थिती उद्भवल्यानंतर महापालिका प्रशासनावर मोठ्या प्रमाणात टीका झाली होती. या प्रकरणातील नाट्यानंतर आता शहरातली पूरस्थिती रोखण्यासाठी महापालिका सरसावली असून आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी उपाययोजनांचा आराखडा तयार करण्याचे आदेश प्रशासनाला दिले आहेत.



खडकवासला धरणातून पाण्याचा विसर्ग केल्यानंतर सिंहगड रस्ता परिसरासह शहरात पूर परिस्थिती निर्माण झाली होती. पूरस्थितीला अनेक कारणे देण्यात येत होती. त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी नेमके कारण समजून घेण्यासाठी महापालिकेने तीन सदस्यीय समिती जुलै महिन्यात नेमली होती. या समितीने अहवाल सादर केल्यानंतर या उपाययोजना केल्या जातील असे सांगण्यात आले होते. परंतु अहवाल जनतेसाठी खुला केला जात नसल्याने पुणेकरांकडून टीका केला जात होती. त्यानंतर महापालिकेने हा अहवाल खुला केला. त्यानुसार आता शहरातली पूरस्थिती रोखण्यासाठी महापालिका सरसावली असून आयुक्तांनी उपाययोजनांचा आराखडा तयार करण्याचे आदेश प्रशासनाला दिले आहेत. त्यानंतर आता शहरात पूर परिस्थितीवर नियंत्रण राहण्यासाठी वर्षभर आधीच नियोजन करण्याचे आदेश डॉ. भोसले यांनी प्रशासनाला आदेश दिले आहेत.

खडकवासला धरणातून पाणी सोडल्यानंतर नदीचे पाणी नागरिकांच्या घरात शिरले होते. नागरिकांचे संसार पाण्यात वाहून गेले होते. नागरिकांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले. तसेच विसर्गामुळे सिंहगड रस्त्यावरील एकतानगरी, विठ्ठलवाडी, निंबजनगर परिसर डेक्कन, खिलारे वस्ती, पाटील इस्टेट या परिसरातही पूर परिस्थिती उद्भवली होती. हा पूर आल्याने महापालिका आणि जलसंपदा विभागातही आरोप-प्रत्यारोप झाले होते. त्यात सुमारे साडेचारशे कुटुंबे बाधित झाली. या परिस्थितीला महापालिका, जलसंपदा विभाग आणि नदीपात्रात टाकण्यात आलेला राडारोडा तसेच नदी सुधार प्रकल्पाचे काम जबाबदार असल्याचे समोर आले आहे.

पूर परिस्थितीसाठी अनेक नवनवीन कारणे पुढे आणली जात होती. त्यामुळे पूर परिस्थितीचे नेमके कारण शोधून काढत त्यावर कामयस्वरूपी उपाययोजना करण्याचे नियोजन महापालिकेकडून केले जाणार होते. पुण्यात अशी परिस्थिती निर्माण झाल्याने खुद्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना घटनास्थळी यावे लागले होते. त्यानंतर पालिकेने महापालिकेने तीन सदस्यांची समिती जुलै महिन्यात नेमली होती. या समितीने सुचविलेल्या उपाययोजनांवर चर्चा करण्यासाठी आयुक्तांनी नुकतीच बैठक बोलविण्यात आली होती.

दरम्यान, या बैठकीत आयुक्तांनी याबाबत सूचना केल्या आहेत. या शिवाय, शहरात अनेक भागांत पर्जन्यमापक बसवावे, त्याची नोंद आपत्कालीन परिस्थिती विभागाकडे करावी, अशा प्रकारच्या सूचना या बैठकीत देण्यात आल्या आहेत.

### 29 ठिकाणच्या नागरिकांचे करणार तात्पुरते स्थलांतर

» पुणे शहरात पूरबाधित होणाऱ्या २९ ठिकाणांच्या नागरिकांच्या तात्पुरत्या स्थलांतरासाठी महापालिकेने पावले उचलली आहेत. त्यासाठी आतापासून जागांची निश्चिती करावी, अशा सूचनाही महापालिका आयुक्तांनी आपत्ती व्यवस्थापन विभागाला दिल्या आहेत. गेल्या काही वर्षांत शहरात अतिवृष्टीमुळे पावसाळ्यात टेकड्यांच्या भागात वारंवार पूरस्थिती उद्भवत आहे. त्यातच नदीची वहनक्षमता घटल्याने खडकवासला धरणातून मुठा नदीत पाणी सोडल्यानंतर नदीकाठ परिसरातही पूरस्थिती निर्माण होत आहे. ही बाब लक्षात घेऊन ही बैठक घेण्यात आली. अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी., शहर अभियंता प्रशांत वाघमारे, समितीचे सदस्य, जलसंपदा विभागाचे अधिकारी या वेळी उपस्थित होते.

# शेवगा निम्म्याने स्वस्त, गुजरातमधून आवक वाढली

## किरकोळ बाजारात 600 रुपये किलो असे उच्चांकी दर मिळालेल्या शेवग्याच्या दरात घट

**पुणे | प्रतिनिधी**

किरकोळ बाजारात ६०० रुपये किलो असे उच्चांकी दर मिळालेल्या शेवग्याच्या दरात घट झाली आहे. शेवग्याच्या दरात घट झाल्याने गृहिणींना दिलासा मिळाला आहे. बाजारात गुजरातमधील शेवग्याची आवक सुरू झाल्याने दरात घट झाल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली.



आमटी, सांबारात सढळ हाताने वापरण्यात येणाऱ्या शेवग्याची आवक कमी झाल्याने तीन आठवड्यांपूर्वी ६०० रुपये किलो असे उच्चांकी दर मिळाले होते. शेवगा महाग झाल्याने गृहिणींचे अंदाजपत्रक कोलमडले होते. शेवगा खरेदीकडे गृहिणींनी पाठ फिरवली होती. उपाहारगृहचालकांकडून शेवग्याचा सांबारात वापर करण्यात येतो. शेवगा महाग झाल्याने उपाहारगृहचालकांकडून शेवग्याला बेताची मागणी होती. तीन आठवड्यांपूर्वी घाऊक बाजारात दहा किलो शेवग्याला ३५०० ते ४००० रुपये दर मिळाले होते. हवामान बदल आणि थंडीमुळे पुणे, मुंबई, ठाण्यासह राज्यातील प्रमुख बाजार समितीच्या आवारात शेवग्याची आवक कमी झाली होती.

शेवग्याची लागवड आंध्र प्रदेश, तामिळनाडू, गुजरात, तसेच महाराष्ट्रातील नाशिक, सोलापूर भागातील शेतकरी मोठ्या प्रमाणावर करतात. तीन आठवड्यांपूर्वी घाऊक बाजारात शेवग्याची आवक कमी झाल्याने उच्चांकी दर मिळाले होते. उच्चांकी दर मिळाल्यानंतर शेतकऱ्यांनी तोड करून मोठ्या प्रमाणावर शेवगा विक्रीस पाठविला. त्यानंतर शेवग्याचे दर कमी झाले. शेवग्याचे दर कमी झाले असून, यापुढे दरवाढ होण्याची शक्यता नाही, अशी माहिती श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील शेवगा व्यापारी रामदास काटकर यांनी दिली.

### गुजरातमधील शेवग्याचा हंगाम सुरू

» गुजरातमधील शेवग्याचा हंगाम सुरू झाला आहे. मार्केट यार्डातील घाऊक बाजारात गुजरातमधून दररोज १०० ते १२५ डाग (एक डाग ३० ते ३५ किलो) शेवग्याची आवक होत आहे. गुजरातमधील शेवग्याची आवक वाढल्याने दरात घट झाली आहे. गुजरातमधील शेवग्याचा हंगाम नोव्हेंबर ते फेब्रुवारी महिन्यापर्यंत सुरू असतो. त्यानंतर सोलापूर, नाशिक भागातील शेवग्याचा हंगाम सुरू होतो. तामिळनाडू, आंध्र प्रदेशातील शेवग्याचा हंगाम चार महिने असतो. परराज्यातील शेवग्याच्या तुलनेत महाराष्ट्रातील शेवग्याला ग्राहकांकडून जास्त मागणी असते.